जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०५/०८/२०२३
## दि.०४/०८/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो.स्टे.१८७/२०२३,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | एक इसम वय ६७ वर्षे रा.मार्केटयार्ड पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०३/०८/२०२३ रोजी दुपारी १६/३० ते रात्री २३/१५ वा.चे. दरम्यान संदेश सोसा सरस्वती बंगला भिमाले कार्यालया समोर मार्केटयार्ड पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे राहते घर कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे कुलूप तोडुन आत प्रवेश करुन लोखंडी कपाटातील २५ हजार रुपये रोख व सोन्याचे तसेच चांदीचे दागिने असा एकुण १४,५८,५००/-रु.किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. कांबळे मो.नं.८८८८८६५९९७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो.स्टे.५०८/२०२३,भादविक २७९,३०४ (अ),सह मो.वा.का.क.१८४ |
| **फिर्यादी** | अनिल यादव वय ३० वर्ष रा.उत्तरप्रदेश |
| **आरोपीत** | संतोष मारुती गिरी वय ४५ वर्ष रा.फलटण सातारा (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०४/०८/२३ रोजी सकाळी ०६/२०वा.चे.सुमारास मुंबई बंगलोर हायवे मामा दा ढाबा समोर जांभुळवाडी पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील टेम्पो हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे ट्रक ला पाठीमागुन धडक देवुन स्वतःचे तसेच इसम नामे दत्तात्रय तुकाराम गिरी वय ५५ वर्ष रा.जळगाव ता.कोरेगाव जि.सातारा यांचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.देशमुख मो.नं.९७६५३९०९४३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे १८३/२०२३,भादविक ४२०,४२७,३४ |
| **फिर्यादी** | विशाल गवळी, वय ३४ वर्ष,रा.हांडेवाडी, पुणे |
| **आरोपीत** | दोन अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २५/०७/२०२३ रोजी सायंकाळी १९/१० ते २०/४० वा.चे दरम्यान कोटक महिंद्र बँक ए.टी.एम.ग्राऊंड फ्लोअर शॉप नं.३,गुरुकृपा हौसिंग सोसायटी लिमिटेड,अपोलो टॉकीजच्या पाठीमागे,सोमवार पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची फिर्यादी की,वर नमुद केले ता.वेळी दोन अज्ञात इसम यांनी कोटक महिंद्रा बँक ए.टी.एम.सोमवार पेठ,खडीचे मैदानाजवळ,पुणे येथील ए.टी.एम.मशीनच्या पैसे बाहेर पडण्याच्या ठिकाणी पट्टी लावून,मशिनचे शटर टेंम्परिंग करुन,नुकसान करुन १०,०००/-रु.काढले म्हणून दोन अज्ञात इसमांनी बँकेची व खातेदारांची,सदर ए.टी.एम.मशिनमधून पैसे काढण्यासाठी आलेल्या नागरिकांची फसवणूक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.सुनिल रणदिवे मो.नं.९०८२३८४२७८ |

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** लोणीकंद पो.स्टे.६२९/२०२३,भादविक ३०४ (अ),३४

**फिर्यादी** सोनु नागुराम वय ४१ वर्षे,रा.देहुरोड,पुणे

**आरोपीत** दोन इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक १७/०७/२०२३ रोजी दुपारी १२/२० वा.चे सुमारास पंचगंगा अॅग्रो टेक प्रा.लि.कंपनीचे वाघोली ता.हवेली जि.पुणे या ठिकाणी असणारे गोडाऊन मध्ये घडला असे.

**तपशिल** लोणीकंद पो.स्टे.अ.मयत रजि.नं.१४२/२०२३,सीआरपीसी १७४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती कागदपत्राचे अवलोकन करता,यातील नमुद इसम यांनी काम घेतलेल्या गोडाऊनचे पत्र्याचे लिकेज काढणे व रिनीव्हेशन करणे हे काम धोकादायक आहे.याची माहीती असताना सुध्दा कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना हेल्मेट,सुरक्षित जाळी,सेफ्टी बेल्ट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता तसेच सदरचे काम हे निष्णात असणाऱ्या कामगारांकडुन करून घेणे गरजेचे होते.याबाबत दुर्लक्ष करून निष्काळजीपणा करून त्यास काम करण्यास भाग पाडुन फिर्यादी यांचा भाऊ संतोष विलास नागुराम वय ४७ वर्षे,रा.एम.बी.कॅम्प,देहुरोड,पुणे.याचे मृत्युस कारणीभुत झाले आहेत.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी.निखील पवार मो.नं.९८२२७९१६९९

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** मार्केटयार्ड पो स्टे १८६/२०२३,भादविक ३७९

**फिर्यादी** एक इसम वय ६२ वर्ष रा.मार्केटयार्ड पुणे

**आरोपीत** अज्ञात (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक ०३/०८/२०२३ रोजी संध्याकाळी १८/३० वा ते १८.४० वा.चे.दरम्यान मयुर ट्रेडींग भुसार मार्केट मार्केटयार्ड पुणे

**तपशिल** यातील फिर्यादी यांनी त्यांची होंडा एव्हीएटर स्कुटर ज्याचे डीक्की मध्ये ५,०६,८००/ रूपये रोख व स्कुटर असा एकूण ५,१६,८००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल असलेली स्कुटर कुणीतरी अज्ञात चोरटयाने वर नमुद ठिकाणा वरुन फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीने चोरीचे उद्देशाने चोरून नेली आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी.डाबेराव मो.न.८३८००८३६७८

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** वानवडी पो स्टे ३८२/२०२३,भादविक ३२६,३२३,५०४,५०६,३४ सह क्रिमिनल लॉ अमेंन्डमेंन्ट कलम ७

**फिर्यादी** दिपक सोनटक्के वय ४० वर्ष,रा.हडपसर,पुणे

**आरोपीत** १.सोहेल शेख वय २३ वर्ष रा.नेहरुपार्क काळेपडळ,हडपसर,पुणे २.आदील मुक्तार शेख वय १९ वर्षे रा.सदर (अटक) व त्यांचे दोन साथीदार

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक ०१/०८/२०२३ रोजी रात्रो २२/३० वा.चे सुमारास श्रीराम चौकाजवळ समोर कॅनॉलच्या पुलावरती महमंदवाडी पुणे येथे घडला असे.

**तपशिल** यातील फिर्यादी व सोहेल हे कामावर असताना सोहेल हा जेवण करुन उशिरा आल्याचे कारणावरुन फिर्यादी व कंपनीचे सिनिअर मॅनेजर सोबत झालेल्या वादाचा राग मनात धरुन वर नमुद केले ता.वेळी फिर्यादी हे कामावरुन सुट्टी झाल्याने रिक्षाने राहते घरी जात असताना वरील इसमांनी त्यांचेकडील मोटारसायकल रिक्षाचे समोर आडव्या लावून फिर्यादी यांना रिक्षातुन खाली उतरवले व "तुला लय माज आला आहे आज तुजा माज जिरवतो" असे म्हणुन शिवीगाळ करुन फिर्यादी यांना लाथाबुक्यांनी मारहाण करु लागले त्याच्या हातातील लोखंडी रॉडने डोक्यात मारुन गंभीर जखमी करुन सदर परिसरात दहशत करुन निघुन गेले.

**त.अंमलदार** पो.उप.निरी.रविंद्र लांभाते, मो.नं.७०३८४०११००

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**